जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी)
( महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग पुरस्कृत स्वायत्त संस्था )
पत्रपेटीक्र.५०४ ,कांचनवाडी,पैठणरोड
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५,महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी: 0240-2379159-61
फॅक्स :0240-2379036
Website : www.walmi.org
E-mail:admn@walmi.org

जा.क्रं.वाल्मी/प्रशासन/ 669 /२०२६ दिनांक: 11 /09 /२०२६

# सीलबंद दरपत्रक (Quotations) मागणी नोटीस
## (अंदाजपत्रक तयार करण्यासाठी )

प्रशासकिय अधिकारी, वाल्मी छत्रपती संभाजीनगर हे वाल्मी संस्थेमध्ये भोजन व्यवस्था पुरविणेसाठी मा. महासंचालक यांच्या कंत्राटदाराकडून वाल्मी भोजनालयाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी मोहर बंद दरपत्रके मागवित आहेत. भोजनालय दरपत्रके दिनांक 15/09/2026 (सकाळी 10:00 वाजता ) ते दिनांक 22/09/2026 (संध्याकाळी 18:00 वाजता ) या कालावधीमध्ये स्विकारल्या जातील. सविस्तर जाहिरात संस्थेच्या www.walmi.org या संकेत स्थळावर पाहण्यास मिळेल. दरपत्रकासोबत व्यवसाय परवाना जोडणे बंधनकारक आहे. दरपत्रके उघडण्याचीतारीख दि.23/09/2026 दु.16:00 वाजता पर्यंत (शक्य असल्यास)

एका कंत्राटदारास एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक आहे.त्याकरिता खुल्या बाजारातील अधिकृत, नामांकित पुरवठादार किंवा संबंधित एजन्सीजकडून स्पर्धात्मक व सीलबंद दरपत्रके (Sealed Quotations) मागविण्यात येत आहेत. इच्छुक पुरवठादारांनी आपली अधिकृत दरपत्रके विहित मुदतीत कार्यालयाकडे सादर करावीत.

❖ **अटी व शर्ती (Terms & Conditions):**

१. इच्छुक पुरवठादारांनी आपले दरपत्रक एका सीलबंद लिफाफ्यात सादर करावे. लिफाफ्यावर स्पष्ट अक्षरात " भोजन व्यवस्था पुरविणेसाठी दरपत्रक" असा उल्लेख असावा.

२. दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करांसह (GST, वाहतूक खर्च व इतर शुल्कांसह) वाल्मी संस्था, छत्रपती संभाजीनगर येथील जागेवर पुरवठा करण्याच्या अटीवर असावेत.

३. सीलबंद दरपत्रके दिनांक 22/09/2026 रोजी दुपारी 16:00 वाजेपर्यंत वाल्मी कार्यालयातील आवक-जावक विभागात स्वीकारली जातील.

४. प्राप्त झालेली दरपत्रके तांत्रिक निकषांवर तपासून, दराच्या बाबतीत जे दर सर्वात कमी (L-१) /सरासरी दर असतील, ते अंतिम करण्यात येतील.

५. पुरवठादार एजन्सीकडे वैध GST नोंदणी प्रमाणपत्र आणि वैध फुड लायसन्स व पॅन कार्ड (PAN Card) असणे बंधनकारक आहे, त्याची प्रत दरपत्रकासोबत जोडावी.

६. कोणतेही कारण न देता प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकृत किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

७. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण — १०२६/प्र.क्र.५० /असंसर्ग-१,दि. ०२/०९/२०२६ या शासन निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहिल.

८. कंत्राटदाराला अन्न व औषध प्रशासन द्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेले शासन निर्णय ,कायदे,नियम व मार्गदर्शन तत्वांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहिल. अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व मानकांचा विचार करुनच दर कोट करावेत.

९. भोजनाची/नगांची संख्या: भोजनाची किंवा साहित्याची संख्या ही निश्चित नसेल. गरजेनुसार ती कमी किंवा जास्त होऊ शकते. संस्थेकडून कोणतीही निश्चित संख्येची शाश्वती दिली जाणार नाही.

१०. किचन साहित्य व उपकरणे: स्वयंपाकघर आणि भोजनासाठी लागणारे सर्व प्रकारचे साहित्य, यंत्रसामग्री, ताट, वाट्या, चमचे, कप, काचेचे कप व इतर सर्व वाढपी साहित्य कंत्राटदाराला स्वतःच्या खर्चाने पुरवावे लागेल.

११. मेसची स्थिती व दुरुस्ती: भोजनालय (मेस) सध्या 'जशी आहे त्या स्थितीत' कंत्राटदाराच्या ताब्यात दिली जाईल. मेस मधील सर्व प्रकारची दुरुस्ती व देखभाल कंत्राटदाराला स्वतःच्या खर्चाने करावी लागेल.

१२. दर पत्रक: कंत्राटदाराने वरील सर्व बाबी (संख्या कमी-जास्त होणे, सर्व साहित्याची पुरवठा करणे आणि दुरुस्तीचा खर्च) लक्षात घेऊनच आपले दर कोट करावेत.

१३. बाजारभाव दरपत्रक हे केवळ अंदाजपत्रक तयार करण्यासाठी मागवण्यात येत आहे. यावरून कंत्राट किंवा काम दिलेच जाईल याची कोणतीही हमी दिली जात नाही.

—sd—

**प्रशासकीय अधिकारी**
**वाल्मी, छत्रपती संभाजीनगर.**

**प्रत:-**

1. **प्रशासन विभाग, वाल्मी छत्रपती संभाजीनगर यांचे नोटीस बोर्ड.**
2. **मालमत्ता व्यवस्थापन उपविभाग, वाल्मी छत्रपती संभाजीनगर यांचे नोटीस बोर्ड.**
3. **वाल्मी वेबसाईट .**

**परिशिष्ट -1 (Annexure-I)**

# दैनिक भोजन मेन्यु तक्ता (2026-27)

प्रशिक्षणार्थींच्या आरोग्यासाठी आणि आवडीनुसार खालीलप्रमाणे दर्जेदार आहार पत्रक (Menu & Standards) निश्चित करण्यात येत आहे:

| अ.क्र. | भोजन प्रकार (Meal Category) | तपशीलवार मेनू आणि प्रमाण (Menu details & Quantity) |
|---|---|---|
| 1 | सकाळची पेये (Beverages)<br><br>कार्यालयीन बैठकासाठी | कमी साखरेचा / गुळाचा चहा/कॉफी किंवा साखरविरहीत.<br>• चहा: 1 कप (80 मि.ली.) आल्याचा/वेलचीचा चहा.<br>• कॉफी: 1 कप (80 मि.ली.) चांगल्या प्रतीची कॉफी. Plain/Black/Liquid Coffee .<br>• गरम दूध: 1 कप (80 मि.ली.) कमी साखरेसह किंवा विनासाखर.<br>•Green tea:1 कप (80 मि.ली.)/ Hearbal Tea |
| 2 | सकाळचा नाश्ता (Breakfast)<br>(Daily Rotation - अमर्यादित) | • मुख्य नाश्ता (अमर्यादित): भाज्या घातलेले पोहे, भाज्यांचा उपमा, (डाळ,मोड आलेले धान्य) ईडली- सांबर,डोसा विथ चटणी,मसाला डोसा, दलिया, मिसळ, साबुदाणा खिचडी, मिलेट खिचडी, उकडलेली अंडी,भाजलेले चने,सुका मेवा आणि बिया,फ्रुट सॅलड, अप्पे,ठोकळा, विविध पिठांचे थालीपीट,भरडधान्य,उकडलेले मक्याचे दाणे,शेंगदाणे (कमी मिठाचे), मोड आलेल्या कडधान्यांची कोशिंबीर, शाबुदाना वडा शॅलो फ्राय.<br>• हंगामी ताजी फळे: (केळी, सफरचंद ,पेरू ,संत्री ,पपई इत्यादी - किमान प्रती २ नग) दररोज<br>•कॉर्न फ्लेक्स (दोन प्रकारचे ) दररोज |
| 3 | दुपारचे व रात्रीचे जेवण (Lunch / Dinner)<br>(Full Meal - अमर्यादित) | • सलाद<br>•वरण/आमटी:डाळ मोड आलेल्या कडधान्याची ,उसळ/ आमटी.<br>• कोरडी भाजी: मोसमी कोरडी भाजी (बटाटा सुकी भाजी,कोबी,फ्लावर,वांगे,भेंडी,शेपु,पालक किंवा सुके कडधान्य इत्यादी).<br>•मांसाहार व्यवस्थित शिजवलेले ,वाफवलेले मासे:चिकन /मटन/अंडा करी (**twice in week wednesday & Friday**)<br>•रस्सा भाजी: पनीर,एक पाले भाजी,मोसमी भाज्या, बटाटा सुकी भाजी,कोबी,फ्लावर,वांगे,भेंडी,शेपु,पालक इत्यादी.<br>• भात: जिरा राईस, पुलाव, व्हेज बिर्याणी, मऊ खिचडी,दालखिचडी,साधा राईस हातसडीचा तांदुळ.<br>• चपाती / भाकरी: मऊ गव्हाची चपाती, फुलका किंवा गरमागरम ज्वारी /बाजरीची भाकरी. मल्टीग्रेन चपाती.<br>• तोंडी लावणी: 50 ग्रॅम घट्ट दही/ताक/ मठ्ठा /सोलकढी, कोशिंबीर, ताजे सॅलड,लोणचे. |

| | | |
|---|---|---|
| | | • मिठाई ऐवजी एक फळ, कमी गुळ असलेली गव्हाची लापशी,कमी गोड असलेला शिरा,शुगर फ्री मिठाई (either lunch or dinner once in a day) |
| 4 | विशेष भोजन (Special Meal) (दर शुक्रवारी किंवा खास प्रसंगी) | • नियमित जेवणासोबत विशेष गोड पदार्थ (उदा. पुरणपोळी, आमरस पुरी ,श्रीखंड-पुरी, बर्फी , पेढे/आईसक्रिम ) आणि विशेष भाजी (उदा. काजू करी / मशरुम मसाला किंवा पनीर पसंदा) समाविष्ट असावी.(गोड पदार्थामध्ये कमी गुळ /साखर असावी.) |
| 5 | संध्याकाळचा नाश्ता (Hi-Tea/Snacks)<br>(प्रमाण: 100 ग्रॅम) | • बिस्कीट (१ पुडा ) (पारले जी ,क्रॅकजैक, २०-२०,हाईड अन्ड सिक, मोनाको,गुड डे ,मारीगोल्ड, न्युट्री चॉईस, Bourbon ओरीओ ,पंतजली बिस्कीट इ.)/कचोरी / कुकीज/ठोकळा /खाकरा / मिलेटस्,मल्टीग्रेन बिस्कीट/अप्पे,सोया टिक्की,आलु टिक्की, Vege Sandwich with brown bread,Sweet corn.<br>• चहा व कॉफी १ कप (मी.ली ). |
| 6 | लंच पॅकेट (Lunch packet)<br>Including Packaging charges. | • चपाती, मसाले भात/पुलाव, 2 सुक्या भाज्या (उदा. बटाटा, फ्लॉवर), लोणचे किंवा चटणी, हंगामी फळ (Seasonal Fruit) किंवा गोड पदार्थ (75 ग्रॅम).<br>प्रमाण: प्रति नग (one unit)<br>• फास्टींग पॅकेट: शाबुदाना खिचडी / भगर,शिंगाडा+ फळे २ नग + राजगीरा किंवा शेंगदाना लाडु२ नग /उपवासाचे चिप्स (१०० ग्रॅम ) .(गोड पदार्थामध्ये कमी गुळ /साखर असावी.) |
| 7 | स्नॅक पॅकेट (Snack packet)<br>Including Packaging charges. | • यापैकी एका पदार्थाचा समावेश (100 ग्रॅम):, साबुदाणा वडा, बटाटा वेफर्स,<br>+ एक गोड पदार्थ (75 ग्रॅम): बर्फी, गुलाबजाम.+ हंगामी फळे (75 ग्रॅम).<br>प्रमाण: प्रति नग (one unit)<br>• फास्टींग पॅकेट: शाबुदाना खिचडी / वडे + फळे २ नग + राजगीरा किंवा शेंगदाना लाडु २ नग /उपवासाचे चिप्स (१०० ग्रॅम ) .(गोड पदार्थामध्ये कमी गुळ /साखर असावी.) |
| 8 | VIP मेजवानी / बँक्वेट मील मेजवानी | • Customized menu .<br>• नेहमीच्या दुपारच्या / रात्रीच्या जेवणासारखेच , त्याव्यतीरीक्त गरजेनुनसार अतिरिक्त पदार्थ समाविष्ट असतील . |
| Including all materials, labour, amenities, insurance, taxes, etc. | | |

# परिशिष्ट-2 (Annexure-II)

## अन्न पदार्थाचा दर्जा उत्तम प्रतिचा असावा

| अ.क्र. | वस्तु | प्रकार |
|---|---|---|
| 1. | तांदूळ | बासमती, कोलम, आंबेमोहोर |
| 2. | डाळी | तूर डाळ चांगल्या दर्जाची (क्र.1) (फटका)<br>मूर्ग डाळ चांगल्या दर्जाची (क्र.1)<br>हरभरा डाळ चांगल्या दर्जाची (क्र.1) (रजवाडी)<br>मसूर डाळ चांगल्या दर्जाची (क्र.1)<br>उडीद डाळ चांगल्या दर्जाची (क्र.1) |
| 3. | गहू/बेसन/रवा/बाजरी/ ज्वारी | एम पी लोकवन/सिंहोर/आशिर्वाद/अन्नपूर्णा/ शरबती गहु |
| 4. | खाण्याचे तेल | सन फ्लॉवर/फॉरचुन/सफोला/जेमिनी/राईसब्रेन (RISSOTTO) |
| 1. | लोणची | बेडेकर/प्रविण/केप्र |
| 2. | पापड | लिज्जत /प्रविण |
| 3. | ब्रेड | ब्रिटानिया/मॉर्डन/शक्ती/डिलक्स/ओव्हण फ्रेश |
| 4. | बटर/तुप | अमुल/आरे/गोवर्धन/गावरान तुप/चितळे<br>/देवगिरी |
| 5. | जाम | मेप्रो/किसान |
| 6. | सॉस | चिंग्स/किसान/डीपी |
| 7. | दूध | चितळे/ विकास/मदर<br>डेअरी/अमुल |
| 8. | चहा | टी-बॅग्ज: ताज महल/लिप्टन/सोसायटी/ |

| | | |
|---|---|---|
| | | ब्रुक बॉन्ड /रेड लेबल |
| ९. | **कॉफी** | नेसकॉफी किंवा रिच कॉफी/ ब्रु |
| 10. | **बिस्कीट** | मॉनॅको,टॉप,गुड डे, क्रॅकजॅक, आरेंज क्रिम, डिलाइट , पार्ले-जी, २०-२०,हाईड अन्ड सिक, ,मारीगोल्ड, न्युट्री चॉईस, Bourbon ओरीओ ,पंतजली बिस्कीट |
| 11. | **मसाला** | प्रविण/एव्हरेस्ट/कॅच/केप्र/बादशहा/M.D.H. |
| 12. | **मिनरल वॉटर** | बिसलेरी/ बेली/अॅक्वाफिना/किनली |
| 13. | **मिठ** | टाटा/अन्नपूर्णा/शेंदेमीठ |
| 14. | **फळांचा रस (विशेष मागणीनुसार)** | Tropicana/Real Fruits/Fresh Fruit Juice |

-sd-

**प्रशासकीय अधिकारी**
**वाल्मी,छत्रपती संभाजीनगर.**